

# शिशुपालवध

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बाल. वा.
दा. क्र. ५८७६५

IRBK-0105765

५७६५

संस्कृत साहित्य सरिता : २१

माघ-कृत

# शिशुपालवध

कथासार

आचार्य

श्रीराम गोसावी

IRBK-0105765

वोरा ॲन्ड कंपनी, पब्लिशर्स

IRBK-0105765

प्रकाशक :
एम्. के. वोरा
वोरा अँन्ड कंपनी,
पब्लिशर्स (प्रायव्हेट) लि०
३ राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रस्ता, मुंबई २

किंमत सहा आणे
पहिली आवृत्ति : १९५६
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

मुद्रक :
अनंत चिंतामण रायरीकर
'स्वस्तिक मुद्रणालय'
४३९ शनवार पेठ, पुणें २

# संस्कृत-साहित्य-सरिता

विशाल महासागराला असंख्य नद्या येऊन मिळत असतात. अशा अगणित नद्यांनींच अमर्याद सागर बनलेला असतो. संस्कृत साहित्याचा महासागरहि असाच अनेक सरितांनीं समृद्ध झालेला आहे. ' संस्कृत-साहित्य-सरिता ' असें नांव दिलेल्या या वाङ्मयमालेंतून आपली आदिभाषा जी संस्कृत तिच्यांतील उत्तम उत्तम वाङ्मयाचा कथारूपानें थोडक्यांत परिचय करून देण्याचें आम्ही योजिलें आहे. संस्कृत वाचणारे थोडे आणि समजणारे तर त्याहून कमी. तेव्हां आजच्या सर्वसामान्य माणसाला, लिहितां-वाचतां येऊं लागलेल्या नवशिक्षितालाहि या संस्कृत-वाणीचा आस्वाद कसा घेतां येणार? परंतु त्यांना तो मिळणें तर आवश्यक आहे; कारण संस्कृत भाषेंतील वाङ्मय हा आपला फार थोर वारसा आहे. तो गमावणें म्हणजे सर्वस्वच गमावून बसणें. यासाठींच संस्कृत भाषेंतील थोर, प्रसिद्ध अशा वाङ्मयकृतींचें, नाटकांचें आणि काव्यांचें, कथासार आम्ही वाचकांपुढें सादर करीत आहोंत.

आम्ही असें समजतों कीं, देवभाषेंतील या वाङ्मयीन कलाकृतींचा परिचय करून देण्याची आमची ही योजना एक चांगली योजना आहे—एक सत्संकल्प आहे. आणि असे सत्संकल्प उत्तम रीतीनें तडीला नेण्याचें काम जनताजनार्दनाचेंच आहे तें तसें घडो, हीच इच्छा.

प्रकाशक

# परिचय

संस्कृत विदग्ध पंचमहाकाव्यांपैकीं माघाचें 'शिशु-पालवध' हें एक महत्त्वाचें महाकाव्य समजलें जातें. हीं संस्कृत महाकाव्यें पंडिती थाटाचीं व क्लिष्ट अशीं आहेत. तेव्हां तीं मुळांतून वाचणारी मंडळी फार थोडी. त्या-मुळें त्यांचा परिचय सुलभतेनें मराठी भाषेंतून करून द्यावा अशी इच्छा कोणीहि करणारच.

यापूर्वीं प्रा. वाटवे यांनीं हें काम ' संस्कृत काव्याचे पंचप्राण ' या पुस्तकाच्या रूपानें केलेलें आहे. पण त्यांचें काम मोठें व सर्वच पंचमहाकाव्यांचा विचार व परामर्ष करून देणारें. या पंचमहाकाव्यांचीं हिंदींतूनहि अशीं कथासारें प्रसिद्ध झालीं आहेत. या काव्यांवर मल्ली-नाथाची फार सुंदर टीका आहे. या सर्वांच्या मदतीनें मीहि हा एक अल्प प्रयत्न केला आहे. माझा हा प्रयत्न फक्त ' शिशुपालवध ' या काव्याचा परिचय करून देणारा आहे.

माघाचा काळ सर्वसाधारण सातवें-आठवें शतक आहे. माघ हा गुर्जर पंडित दिसतो. तो मोठा वैय्या-करणी व शब्दशास्त्रनिष्णात होता. त्याच्या घराण्यास मोठा राजाश्रय पूर्वकाळपासून असल्याचे उल्लेख सांपड-तात. कालिदासाची उपमा प्रसिद्ध, भारवी अर्थगौरवा-बद्दल सर्वांस विशेष परिचयाचा व दंडीचें पदलालित्य हें फार वाखाणण्यांत येतें. पण हे तिन्ही गुण माघांत असल्याची एक कव्युक्ति आहे; ती ' शिशुपालवध ' या काव्यांत सार्थ झालेली दिसून येते.

— लेखक

# शिशुपालवध

एक दिवस नीलनभांतून द्वारकेवर एक तेज उतरत असल्याचा भास झाला. सर्व द्वारकावासी त्या अलौकिक तेजानें दिपून गेले. हा सूर्यदेव कीं अग्निदेव प्रत्यक्ष खालीं येत आहे, याचा त्यांना प्रथम निश्चय करतां येईना. सूर्यदेव हा पश्चिमेकडून खालीं येणारा, हें तेज तर चहूं-बाजूंनीं खालीं उतरत असलेलें दिसतें, तेव्हां हा सूर्यदेव खास नव्हे. अग्निदेवाच्या ज्वाला तर नेहमीं वरतीं उसळणाऱ्या, तेव्हां हा अग्निदेवहि नव्हें. कांहीं तरी तेजाचा पुंज खालीं येत आहे खास. तो तेजाचा पुंज जसा जसा जवळ आला तसा तसा तो कोणी तरी शरीरधारी असावा, असें भासलें व तो अगदींच द्वारकेच्या समीप आला, तेव्हां तो कोणी तरी दिव्य पुरुष असावा अशी खात्री झाली. पण अगदीं समीप आल्यावर 'अरे हा नारद,' असे उद्गार सर्वांच्या तोंडून बाहेर पडले. भगवान् श्रीकृष्णांनीं नारदास ताबडतोब ओळखलें. नारदाच्या जटा कमलकेसराप्रमाणें पिंगट रंगाच्या होत्या. त्यांचा रंग शरद् चंद्रम्याप्रमाणें गोरापान होता. गळ्यांत शुभ्र यज्ञोपवीत व स्फटिकमाळा विराजत होती. मनोरम काळ्या रंगाचें हरिणाजिन त्यांच्या अंगावर शोभत होतें व 'तुंई तुंई' असा मधुर

नाद करणारी त्यांची 'महती' वीणा सर्वांना तत्काल आकर्षून घेत होती.

भगवान् श्रीकृष्णांनीं नारदांना अभ्युत्थान दिलें. त्यांची पूजा केली व उच्चासनावर बसवून अभिनंदनपर म्हणून बोलले कीं, आपलें दर्शन त्रिकाळ सौभाग्यकर आहे. वर्तमानकाळांत तें पापहर आहे. भविष्यांत तें कल्याणाचें शुभसूचक आहे; व भूतकालांतील शुभ कर्मांचा तो पुण्य-परिपाक आहे. परंतु आपल्या मुखकमलांतील वचन-माधुरीच्या अपेक्षेनेंच विचारीत आहे कीं देवर्षींचें येणें कोणत्या अपेक्षेनें होत आहे? वस्तुतः आपण निरपेक्षच आहांत!

देवर्षि नारदांनीं भगवंतांना आशीर्वाद दिले. आपल्या कमंडलूंतील सर्वतोभद्र जल भगवंतावर शिंपडलं. भगवंतांनींहि तें पुण्यजल नतमस्तक करून सन्मानिलें. हा प्रत्युपचार झाल्यावर नारद म्हणाले, "भगवंता, तुझें दर्शन हें महायोग्यांनाहि अपेक्षित असतेंच. म्हणून तें माझें जवळचें अपेक्षित असलें तरी महेंद्राचा संदेश घेऊन मी इंद्रलोकाहून आलों आहें तेव्हां तो संदेश ऐकावा :

"पूर्वकालांत दितीचा हिरण्यकश्यपु म्हणून एक पराक्रमी पुत्र होता. त्यानें देवांना पराजित करून स्वर्गाचें राज्यहि जिंकलें होतें. त्या असुरास नारसिंहाचें भयंकर रूप धारण

करून आपण वधिलें होतें. पुढें हाच हिरण्यकश्यपु रावण-रूपानें जन्मास आला. आशुतोष शंकराच्या वरदानामें त्यानेंहि सर्व देवांस सतावून सोडलें. विष्णूचें चक्र, वरुणाचा नागपाश व यमाचें नियमनहि त्यांस भिववूं शकत नव्हतें. त्यानें कुबेराचें पुष्पक विमान त्याचेपासून छिनून घेतलें. यमाच्या रेड्याचीं शिंगें उपटलीं. विघ्नहर्त्या गणेशाचा एक दंत उखडून त्याला विघ्नांत घातलें. पण जानकीहरण करणाऱ्या त्या उन्मत्ताचें प्राणहरण आपण रामावतारीं करून अजरामर कीर्ति मिळविली. तोच रावण आतां वर्तमानकालीं शिशुपालाचें रूप घेऊन त्याच राक्षसी क्रिया करीत आहे. ज्याप्रमाणें एकादी पतिव्रता सती जन्मोजन्मीं आपल्या पतीलाच अनुसरते, त्याचप्रमाणें व्यक्तीची प्रकृतीहि त्याचा मूळ स्वभावहि जन्मजन्मांतरीं त्याला सोडीत नाहीं. शिशुपाल हा मदोन्मत्त झाला आहे. लोकांना त्याप्रमाणें देवांनाहि तो सतावीत आहे. साधूंचें परित्राण व दुष्टांचा विनाश करणें तुझें अवतारकार्यच आहे. तरी शिशुपालास यमसदनास पाठव. हाच महेंद्राचा, भगवंता तुला संदेश आहे. ”

भगवान् श्रीकृष्णांनीं महेंद्र-संदेशास स्वीकृति दिली. तेव्हां नारदमुनींची स्वारी स्वस्थळीं निघून गेली.

नारदमुनी जातात न जातात तोंच धर्मराज युधिष्ठिराच्या

राजसूयाचें निमंत्रण भगवान् श्रीकृष्णांस आलें. इकडे भक्तराज पांडवांचें निमंत्रण तर तिकडे महेंद्राचा आदेश! भक्तांचे आर्त प्रथम पुरे करावयाचे कीं शत्रूचें निकंदन प्रथम करावयाचें या दुविधेंत भगवान् श्रीकृष्ण पडले. म्हणून सल्लामसलत करण्यासाठीं भगवंतांनीं बंधुराज बलभद्र व बृहस्पति-शिष्य उद्धव यांस बोलावून घेतलें व आपली समस्या त्यांच्यापुढें मांडली.

भगवान् श्रीकृष्ण म्हणाले, " आपलें मत कळण्याला निमित्त मिळावें म्हणूनच प्रथम मी माझें मत मांडीत आहें. आपलें मत समजून घेण्यासाठीं हें माझें मत मंगलाचरणच समजाना. धर्मराज युधिष्ठिर आपल्या चार पराक्रमी बांधवांच्या मदतीनें राजसूय यज्ञ सहज करूं शकेल. पण शत्रूचा यज्ञ करणें हें माझें काम आहे. वाढता शत्रु व वाढता रोग याची उपेक्षा शहाण्यानें करूं नये असें म्हणतात. शिशुपाल माझ्याशीं वैर करतो यापेक्षा तो जगाला छळीत आहे, याची चीड मला अधिक येत आहे. तेव्हां त्याला प्रथम मारावें असें माझें मत आहे. अगदीं मोठा मुत्सद्दी झाला तरी त्याला आपल्या मतास दुजोरा नसला तर कार्यवस्तूंत हातीं घेतलेल्या कामाविषयीं शंका उत्पन्न होते. म्हणून तुमचें मत मला अवश्य हवें आहे. "

यावर बलरामांनीं आपलें मत दिलें. ते म्हणाले,

" राजकारणांत आपल्या कार्याची निश्चिती प्रथम पाहिजे. ही कार्य-निश्चिती नसणाऱ्या माणसाचें शब्दावडंबर फुकट जातें. शत्रूचा समूळ उच्छेद करणें हें उदयेच्छूनें आपलें कार्य प्रथम निश्चित केलें पाहिजे. य़ासाठीं कृष्णानें जें अर्थगंभीर भाषण केलें आहे त्याचें भाष्यच मी करीत आहें, असें समजा. एक जरी शत्रु मनुष्यास असला तरी त्याला सुख कोठलें ? देवशत्रू राहूनें अद्यापिहि चंद्राचा पिच्छा सोडला नाहीं. शिशुपालास द्यावयाची रुक्मिणी कृष्णानें हरण केल्यानें शिशुपालाच्या मनांत कृष्णाविषयीं पक्कें वैर बद्धमूल झालें आहे. इकडे भौमासुरावर कृष्णानें हल्ला केला असतां, शिशुपालानें द्वारकेवर स्वारी करून एक यदुस्त्री पळविली, याचा डंख कृष्णाचे मनांत वसत आहे. तेव्हां शत्रूचें समूळ उच्चाटन केल्याशिवाय प्रतिष्ठा खोटी आहे. शत्रूची खोडी काढून मागून स्वस्थ बसणें म्हणजे एका बाजूला आग लावून दुसऱ्या वाऱ्याच्या बाजूनें गवताच्या गंजींत जाऊन झोंपण्यासारखेंच आहे. अजाणत्या अपराध्याला क्षमा करतां येते, पण जाणून बुजून अपराध करणाराला कोण क्षमा करील ? त्यांतून शिशुपालाचा आधार जरासंध हा नाहींसा झाल्यानें शिशुपालाला मारण्यास ही संधी नामी आहे. पांडव खुशाल राजसूय यज्ञ करोत. इंद्राला स्वर्गाचें रक्षण करूं दे व सूर्याला प्रकाशूं दे; पण आपण मात्र शत्रूला मारूं. प्रत्येकानें आपला स्वार्थ पाहिला पाहिजे. "

यावर उद्धव बोलला " शत्रुजय सहज शक्य असेल तर तो जरूर प्राप्त करावा; याविषयीं दुमत नाहीं. पण शिशुपाल असाहाय्य नाहीं. कालयवन, शाल्व इत्यादि त्याचे पाठीराखे पहिल्यापासून आहेत. शिवाय लढाई झालीच तर बाणासुरादि आपले पूर्ववैरी त्याचे बाजूनें होतील. शिशुपालाचे मित्र व आपले शत्रू तात्काल आपले-विरुद्ध एकजूट करतील व आपले मित्र व त्याचे शत्रू आपल्या बाजूला येतील. एकूण सर्वच राजे ह्या ना त्या पक्षानें युद्धांत ओढले जातील व धर्मराजाचा राजसूय या युद्धजन्य परिस्थितीनें बाजूला पडेल. यामुळें आपले भक्त पांडव यांच्या मनोरथांत आपणच विघ्न करून त्यांचें शत्रुत्व पत्करल्यासारखें होईल. शत्रु मागून मारतां येईल पण भक्ताचें मन दुखविणें हें ठीक नव्हे. तुझ्या विश्वासा-वर धर्मराजानें राजसूयाची आयोजना केली आहे. तेव्हां त्याला अगोदर मदत करावी, असें माझें मत आहे. राजसूयाच्या निमित्तानें आपले मित्र राजे तेथें जमतीलच. त्यांचें शक्तिसाहाय्य आपणांस तेथेंच आपोआप मिळेल. राजसूयांत तुझी अग्रपूजा होईल. ती शिशुपालास सहन होणार नाहीं. त्याचे अपराधहि पुरेपूर त्यावेळीं त्याचे पदरांत घालतां येतील व सर्वांच्या क्रोधाग्नींत शिशुपाल सहजगत्या भस्मसात् होऊन जाईल. "

२०९६५
आलबाई?
५२३
२५।१२।४१

शेवटीं उद्धवाचा सल्लाच सर्वश्रेष्ठ व दूरदर्शीपणाचा ठरला. त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय झाला. यदुसेना दुहेरी हेतूनें सिद्ध झाली. राजसूयाची पूर्तता व शिशुपालाचें निकंदन हे दुहेरी हेतु ठेवून भगवान् श्रीकृष्णाची यदुसेना तयार झाली.

यदुसेना युद्धसज्ज होऊन बाहेर पडूं लागली. तेव्हां भगवान् श्रीकृष्णांची शोभा कांहीं विशेषच होती. त्यांच्या मस्तकावर पूर्णचंद्राप्रमाणें श्वेतछत्र विराजत होतें. परिचारक त्यांच्यावर श्वेतचामरें वारीत होते. भगवंताच्या मस्तकावर रत्नमय मुकुट शोभत होता. कानांत मकरकुंडलें व गळ्यांत कौस्तुभहार चमकत होता. त्यांच्या अंगावरील रत्नांत भोंवतालचें वस्तुजात प्रतिबिंबित होत होतें त्यामुळें अनंत ब्रह्मांडें प्रत्यक्षच त्या परमात्म्यांत सामावून जात असल्याची साक्ष आपोआपच मिळत होती. एका हातांत कौमोदकी गदा, तर एका हातांत 'नंदक' खड्ग. त्या शार्ङ्गधराच्या हातांत शार्ङ्ग धनुष्य व सुदर्शन चक्र होतें. अशा आयुधांच्या थाटांत भगवंताची स्वारी निघाली. श्रीहरीच्या विराट स्वरुपासारखीच विराट सेना भगवान् श्रीकृष्णांबरोबर द्वारकेबाहेर पडली. ही सर्व सेना कच्छ प्रदेशाजवळ आली, तेव्हां सैनिकांनीं तेथें लवंग-

पुष्पांच्या माळा धारण केल्या, माडावरचे नारळ काढून ते त्यांतील पाणी यथेच्छ प्याले व ओल्या सुपाऱ्या त्यांनीं खाल्ल्या. समुद्रकांठचे हें आतिथ्य असेंच असतें.

लवकरच ती सारी सेना रैवतकापाशीं आली. आपल्या सहस्रशिखरांनीं सारें नभोमंडळ व भूधरांनीं सारी पृथ्वी व्यापल्यामुळें, त्याचप्रमाणें त्या पर्वतावरील सोन्याच्या खाणीमुळें तो रैवतक यावेळीं सहस्रशीर्ष हिरण्यगर्भ ब्रह्मदेवासारखाच भासत आहे. नानाप्रकारचे निर्झर त्यांतून वाहात आहेत. त्यांच्या सरोवरांत इंद्रनील मण्याच्या शिलांवर सूर्यचंद्राचा प्रकाश पडला म्हणजे ठिकठिकाणीं इंद्रधनुष्याची शोभा दिसत आहे. जों जों रैवतकाकडे पाहावें तों तों त्याचें रमणीयत्व नवनवीन दिसत आहे. जें हरक्षणीं नवीन नवीन भासतें तेंच रमणीयतेचें खरें स्वरूप होय यांत कांहीं शंका नाहीं. रैवतकावरील हवा न थंड आहे न गरम आहे. अनेक नद्या रैवतकापासून वाहात आहेत व त्यांच्या दोन्ही तटांवर कमळें फुललीं आहेत. हीं सर्व शोभा पाहून श्रीकृष्णाचा सारथी म्हणाला, " महाराज, हा रैवतक आपल्या सर्व लावण्यानें आपलें स्वागत करीत आहे." या पर्वतावरील सूर्यकांत दिवसा अग्नि बाहेर फेकीत असल्यामुळें हा तापून जातो तर रात्रीं चंद्रकांताच्या स्रवण्यामुळें याला नित्य स्नान घडतें. यावरून हा कोणी उग्रव्रतधारी महापुरुष असावा असें वाटतें."

सारथ्याचें मनोहर भाषण ऐकून व रैवतकाची शोभा पाहून भगवंतांनीं आजचा मुक्काम येथेंच करण्याचें ठरविलें. लगेच प्रचंड सेनेचा डेरा रैवतकावर पडला. कांहीं शूर राजांनीं तर सिंहांना मारून त्यांच्या गुहांतूनच आपला मुक्काम ठोकला. तेथें हत्तीच्या गंड-स्थळांतून पडलेल्या मोत्यांचा खच त्यांना प्राप्त झाला. कांहींनीं आपला मुक्काम वृक्षाखालींच ठेविला. राज-स्त्रियांसाठीं मखमलीचे तंबू उभारण्यांत आले. कृष्णसेनेंतील उंटांनीं उत्तुंग वृक्ष कुरतडून खाल्ले तर हत्तींनीं मोठमोठे वृक्ष आपल्या शुंडादंडांनीं खालीं पाडले. तेव्हां गोवर्धन-रक्षकास रैवतकाची ही रेवडी उडविण्याची कां हुक्की आली, अशी शंका अनेकांस येऊं लागली.

श्रीकृष्णांनीं जेव्हां रैवतकावर मुक्काम केला, तेव्हां सहाहि ऋतु त्यांच्या सेवेसाठीं एकामागून एक तेथें आले. सर्वप्रथम वसंतानें आपल्या नवीन पल्लवांसहित व फुलांनीं सजलेल्या अवस्थेंत आपलें दर्शन दिलें. नंतर आला ग्रीष्म. त्या वेळीं पाटल, शिरीष व चमेली सर्वत्र फुलून त्यांच्या सुगंधानें सर्व भूप्रदेश दरवळून निघाला. ग्रीष्मानंतर वर्षा आला, हें मेघवर्षावानें सांगितलें. विद्युत् व इंद्रधनुष्य यांनीं त्याची शोभा अधिकच वाढविली होती. यावेळीं मयुरांच्या केका सुरू झाल्या. यानंतर शरद आला, तेव्हां हंसांचें कूजन सुरू झालें व मोर मूक झाले. लाल रंगाच्या

जपाकुसुमांनीं सारा वनप्रदेश सुरंग दिसूं लागला. रक्तकमळें सर्वत्र फुललीं. यानंतर हेमंत व नंतर शिशिर आला. प्रियंगु लतांवरील फुलें विकसलीं. सर्व ऋतूंची ही भावनोद्दीपक सेवा पाहून कामी जनांच्या मनांत विलासाचा विकार उद्भवला व यादव सेनेंतील वीर व यदुस्त्रिया या विलासांत सामील होण्यासाठीं आतुर झाल्या. यावेळीं अनेक यदुवीर आपल्या स्त्रियांसहित वनविहारासाठीं बाहेर पडले. रमणरमणीमध्यें हास्यविनोद सुरू झाला. विहार करून तरुणतरुणींचा तो तांडा थकला तेव्हां थकवा घालविण्यासाठीं सर्व मंडळी सरोवरांत जलक्रीडा करण्यासाठीं उतरली. त्या वेळीं सोन्याच्या पिचकाऱ्या घेऊन एकमेकांवर त्यांनीं पाणी उडविलें. कांहींनीं सुगंधी द्रव्याच्या उटी एकमेकांना लाविल्या. यावेळीं सायंकाळ झाली व सूर्यहि जणुं जलाशयांत उडी घेण्यासाठीं खालीं उतरला. त्या वेळीं जलविहार संपला. नंतर रमणरमणींचें सहपान सुरू झालें. पुढें रात्र झाली व रात्र संपली. उदयगिरीवर पुन्हां सूर्य वर आला, तशी ती यदुसेना पुढचा मार्ग आक्रमण करूं लागली.

भगवान् श्रीकृष्ण आपल्या चार घोडयांच्या रथांतून निघाले. त्यांच्या मागून दुसरे मांडलिक राजे चालूं लागले. स्वारांनीं घोडयांस टांचा मारल्या. प्रथम घोडे, उंट, रथ यांच्या चालण्यानें जमिनीवरील धूळ वर उडे पण गजदल

चालूं लागतांच ती धूळ पुन: दबून समतल होई. सेनेच्या पुढें ढोल व तुताऱ्या वाजत होत्या.

यामुळें मार्गावरील गांवांतील ग्रामस्त्रिया शेताजवळील कुंपणावरून आपल्या माना उंच करून श्रीकृष्णदर्शन घेतांना दिसत होत्या. कांहींनीं तर भगवंतांचें दर्शन घेऊन श्रीकृष्णांचा नामजप सुरू केला. कांहीं गाई आपल्या वत्सांना पाजीत होत्या, त्यांनीं कान टवकारून व पुच्छ वर करून गोपाळकृष्णाकडे पाहिलें. अशा प्रकारें नद्या, पहाड, गांव, वाड्या उल्लंघीत ती सेना यमुनेजवळ आली. मार्गांत अनेक साहाय्यक राजे, समुद्राला जशा नद्या, तसे येऊन मिळाले. कोणाकडून उपसर्ग झाला नाही. कांहींनीं यमुना पाय-उतार केली, तर कांहीं नौकेवर चढले. गजदळ तर सहजच यमुनापार झालें. घोडदळांतील घोडे किनाऱ्याकडे दृष्टी लावून व तोंड उंच करून यमुना मोठ्या गंभीरपणें पार करूं लागले. रथचक्रांनीं यमुनेचें पाणी खळबळून गेलें.

भगवान् श्रीकृष्ण यदुसेनेसह यमुना पार झाल्याचें ऐकतांच अतिशय आनंदित होऊन धर्मराजा सर्व बंधुंसहित भगवंतास सामोरा झाला. भगवंतांनीं रथांतून उडी मारून प्रथम धर्मराजाला नमस्कार केला. जग ज्याच्यापुढें नमतें, तो धर्मापुढें धर्ममर्यादेसाठीं आधीं नमला. धर्मानें आपल्या जीवनाधार

श्रीकृष्णाला हृदयाशीं कवटाळलें. अर्जुनाशीं भगवंतानें हस्तांदोलन केलें. नकुल-सहदेव भगवंतांच्या चरणीं दंडवत् झाले. पांडवांच्या स्त्रिया यादवरमणींना प्रेमानें भेटल्या. यावेळीं यादववीरांनीं पांडववीरांना, सैनिकांनीं सैनिकांना आलिंगनें दिलीं. उभय सेनेंतील हत्ती मात्र हत्तीणीपासून दूर ठेवण्यांत आले. यादव-पांडव वीरांचा हा संयम खरोखरच लोकविलक्षण होता. पण यांत आश्चर्य कसलें ! थोरांचें सर्वच लोकविलक्षण असतें.

यानंतर धर्मराजानें भगवान् श्रीकृष्णांना रथांत बसविलें व तो स्वतः भगवंताचा सारथी झाला. अर्जुनानें श्रीकृष्णावर श्वेतछत्र धरलें. नकुल, सहदेव व भीमहि भगवंतावर चामरें ढाळूं लागले. गंगायमुनेप्रमाणें पांडवसेना व यदुसेना इंद्रप्रस्थ नगरीच्या समीप एकमेकांत मिळून गेल्या.

राजसूयाला आलेल्या हजारों राजांचा इंद्रप्रस्थ नगरीला प्रेमाचा वेढाच पडला होता. श्रीकृष्णाची स्वारी इंद्रप्रस्थ नगरींत येत असतां नागर स्त्रियांची त्यांना पाहण्यासाठीं कोण धांदल ! उतावळेपणामुळें कटीचीं आभूषणें गळयांत, कानांचीं डोक्यावर व शिरोभूषणें भलत्याच ठिकाणीं त्यांनी घातलीं. उत्तरीयें नेसून प्रत्यक्ष नेसूंचें वस्त्र त्यांनीं अंगावर घेतलें. श्रीकृष्णाचें दर्शन होतांच लाह्या व अक्षता

त्यांनीं त्याच्यावर उधळल्या व कृष्णदर्शन होतांच त्यांची सर्व शुद्ध बुद्ध हरपून सर्व भुवनांना आपल्या उदरांत सामावणाऱ्या श्रीहरीला त्यांनीं आपल्या डोळयांत सामावण्याचा प्रयत्न केला.

याप्रमाणें भगवंताची स्वारी पांडवांच्या मयसभेपाशीं आली. इंद्रभवनालाहि लाजविणाऱ्या त्या मयसभेची शोभा काय वर्णावी! तिची फरशी पद्मराग मण्याची केली होती. भिंती स्फटिकाच्या होत्या. तिचीं गगनचुंबी गोपुरें चंद्र-सूर्याशीं उंचींत स्पर्धा करीत होतीं. पाचूच्या फरशीवर प्रकाश पडला कीं तींतून हिरवेगार किरण दुर्वांसारखे बाहेर पडत व पाळीव हरिणें तीं कुरतडण्यासाठीं धांव घेत. जलाच्या ठिकाणीं स्थलाचा भास होई व स्थलाच्या ठिकाणीं जलाचा भास होई. त्यामुळें अंधपुत्र दुर्योधनाची फसगत होऊन भीम त्याला हंसला व ही थट्टा पुढें कुलक्षयाला कारण झाली. अशी अद्भुत मयसभा पाहून सर्वांसच आनंद व आश्चर्य वाटलें. इंद्रप्रस्थ नगरींत भगवान् कृष्ण असेपर्यंत रोज उत्सव करण्याची घोषणा धर्मराजानें केली. भगवंताची प्रशंसा करतांना धर्मराजा श्रीकृष्णाला म्हणाला, "भगवंता, तुझ्याशिवाय इतरांची स्तुति करतांना मनाला संकोच वाटतो. कारण इतरांचे गुण थोडे व त्यांची स्तुतिप्रियता अधिक त्यामुळें खोटेपणा पदरीं येतो. पण तुझी स्तुती करण्याला मनाला संकोच वाटत नाहीं; कारण तुझे गुण

अनंत व शक्ति अनंत. पण तूं मात्र संकोच न करतां मी काय बोलतों, तें ऐकून घे. आज मी भरतवर्षाचाच काय पण चतुर्दिशांचा सम्राट म्हणून विराजत आहें, ही तुझी कृपा. आतां मी राजसूयरूपांत तुज यज्ञनारायणाची पूजा करूं इच्छित आहें. मनुष्याचें सर्व धन यज्ञार्थ आहे असें श्रुतिस्मृतींनीं सांगितलें आहे. सर्व धर्माचें मूळ तूं, म्हणून मी करीत असलेला राजसूय शेवटीं तुलाच येऊन पोहोंचणार. यासाठीं विनंति कीं तूं मला राजसूय यज्ञ निर्विघ्न पार पाडण्यास साहाय्यक हो."

यावर श्रीकृष्ण उत्तरले, "धर्मा, तूं पृथ्वीपति झालास याला तुम्हां पांडवांचा पराक्रमच कारण होय. आपल्या व्यायामानें शक्ति व आरोग्य कमाविणाऱ्याचें श्रेय वैद्याला घेतां येत नाहीं. राजसूय यज्ञ राजानेंच करावयाचा असतो. तूं पृथ्वीपती राजा, तेव्हां राजसूय करणें तुलाच भूषणावह. तुझ्या यज्ञांत मी हवें तें काम करण्यास सर्वदा सिद्ध आहें. जशी तूं अर्जुनाला मोकळेपणें आज्ञा करशील, तसाच मला समजून काम सांगत जा. इतकेंच नव्हे तर जो कोणी राजा तुझी आज्ञा या यज्ञांत मानणार नाहीं, त्याचें शिर माझें सुदर्शन त्याच्या धडावर राहूं देणार नाहीं, ही खात्री बाळग."

म. ग्रं. सं.
क्र. ५७६५(१२)

यानंतर राजसूयाची तयारी धुमधडाक्यानें सुरू झाली. पुरोहितांनीं निरनिराळ्या देवतांचीं आवाहनें सुरू केलीं. होते व अध्वर्यु यजुर्वेदाचे व ऋग्वेदाचे पाठ म्हणूं लागले. उद्‌गात्याचें सामगान सुरू झाले. हर्माची मेखला घालून यजमान-पत्नि द्रौपदी सर्व सामग्रीची व्यवस्था करून इकडे तिकडे मोठ्या वैभवानें हिंडत होती. यज्ञाचा धूर देवांना त्याची वार्ता सांगण्यासाठीं स्वर्गात जाऊन भिडला. त्यामुळें देव आनंदित झाले. ज्या यज्ञांत प्रत्यक्ष यज्ञनारायण जातीनें सेवा करतो आहे, तेथील हविर्भाग स्वत: घेण्यासाठीं स्वर्गातून देवसुद्धां भूलोकावर खालीं उतरले. यामुळें शच्यादि देवभार्यांना प्रोषित भर्तृकाचीं व्रतें घ्यावीं लागलीं व मंदारमालाच्या वेण्या न घालतांच सुकून जाऊं लागल्या.

धर्मानें सर्वांचा खूप स्वागत सत्कार केला. सुवर्णदान व भूमिदान राजानें अपार केलें. मांडलिकांनीं जें धन आहेर म्हणून धर्मराजाला दिलें तें धर्मराजानें याचकां-कडून अक्षरश: लुटविलें. यज्ञभोक्ता प्रत्यक्ष श्रीनारायण असल्यानें धर्माचा होम, दान इ. यथासांग पार पडलें.

अशा प्रकारें राजसूय यज्ञ अत्यंत थाटानें समाप्त होत असतां अग्रपूजेचा प्रश्न निघाला. धर्मानें भीष्म पिता-महांचा सल्ला विचारला तेव्हां भीष्म पितामह म्हणाले,

" पूजनीय लोक म्हणजे गुरुबांधव, ऋत्विज, स्नातक, जामात व राजा. या ठिकाणीं पूज्य ऋत्विज आहेत, पराक्रमी राजे आहेत, विद्वान् स्नातक आहेत. यांची वेगवेगळी पूजा करावी, किंवा जो सर्वगुण-श्रेष्ठ अशा एकाचीच अग्रपूजा करावी. माझ्या मतें भगवान् श्रीकृष्णाशिवाय या जमलेल्या सभासदांत दुसरा कोण श्रेष्ठ आहे ? तेव्हां तोच अग्रपूजेला पात्र आहे. हाच भगवान् या सृष्टीचा कर्ता, धर्ता व हर्ता आहे. हाच ब्रह्मा, विष्णु व शिव या स्वरूपानें या जगाचें उत्पादन, रक्षण व संहार करीत असतो. यानेंच मत्स्य, कच्छ, वराहादि अवतार आजवर घेतले व कृष्णरूपानें हा महाप्रभू आपल्यामध्यें अवतरला आहे. योग्यांचें समाधिधन हाच व भक्तांची पूजामूर्ति हाच. तेव्हां याचीच अग्रपूजा कर व अर्घ्यदान यालाच दे."

तेव्हां पितामहांची आज्ञा शिरसावंद्य मानून, धर्मानें राजसूय यज्ञांतील अग्रपूजेचा विधी भगवान् श्रीकृष्णास संबोधून सुरू केला. पण श्रीकृष्णाची ती पूजा पाहातांच शिशुपालाचा जळफळाट झाला.

भगवान् कृष्णासंबंधीं आपलें सर्व पूर्व-वैर शिशुपालाच्या मनांत उभें राहिलें. कृष्णाची पूजा पाहून तो मत्सरानें काळा पडला व क्रोधानें लाल होऊन तो धर्माला तावातावानें म्हणाला, " धर्मा, तूं खरा धर्म नाहींस;

याच्या गुणापेक्षां नातें जवळचें मानून तूं याची अग्रपूजा केलीस. या गवळ्याचीच या राजसूयांत तुला पूजा करावयाची होती तर या मूर्धाभिषिक्त राजांना तूं यज्ञांत बोलाविलेंस तरी कशाला ? या गवळ्याच्या पूजेनें तुझें राजसूयांतील हवन अग्निमुखीं न होतां श्वानाच्या मुखांत केल्यासारखें झालें आहे. तूं सत्यवादी म्हणवतोस पण हें फारच मोठें असत्कर्म तूं केलें आहेस. या भीष्माची तर साठी बुद्धि नाठी झाली आहे. ”

यानंतर कृष्णास उद्देशून तो म्हणाला, “ अरे गवळ्या, तूं राजा कधींपासून झालास ? जरासंधानें तर तुझ्यापासून सारी भूमि हिसकावून तुला कधींच देशोधडीं लाविलेलें आहे. तूं स्वतःला मधुसूदन म्हणवून घेतोस पण तूं त्या मधु दैत्याला मारलें नाहींस तर मधमाशांच्या पोवळ्यावरील मधमाशा मारल्यास, म्हणून लोक तुला मधुसूदन म्हणत असावे. तुला सत्यप्रिय म्हणतात ते सत्यभामेचा पति म्हणून; तुला सत्य प्रिय आहे म्हणून नव्हे. न तुझ्यापाशीं भूमी, न राजलक्ष्मी आहे ! न पराक्रम आहे, न शौर्य आहे ! तुझ्यासारख्या गुणविहीनाची ही अशी अग्रपूजा करणें म्हणजे केशविहीन डोक्याची फुकट वेणीफणी करणें आहे ! ”

यानंतर तो जमलेल्या राजांना उद्देशून म्हणाला,

" तुम्ही सिंहासारखे विक्रांत असून या कोल्ह्याची अग्र-पूजा कशी सहन करतां ? दूध पाजणाऱ्या पूतनेस मारणारा हा प्रत्यक्ष मातृहत्यारी व ज्यांच्या गाई यानें जन्मभर वळल्या त्या मामाचा वध करणारा हा भ्रातृघातकी ! हे जारपुत्र पांडव, हा जरठ भीष्म व हा कंसभृत्य तुम्ही एकदमच कां मारून टाकीत नाहीं ? "

यावर भीष्म खवळले. सहदेव क्षुब्ध झाला. पण भगवान् श्रीकृष्ण कांहींच बोलले नाहींत. सिंह हा घनगर्जनेला साद देतो, कोल्हेकुईला तो कधीं प्रत्युत्तर करीत नाहीं, हेंच खरें ! पण भीष्मांनीं उत्तर केलें, " श्रीकृष्णाची अग्रपूजा आम्हीं जाणून बुजून केली आहे. ती ज्या राजांना संमत नसेल त्यांच्या मस्तकावर हा माझा पाय आहे. "

असें आव्हान होतांच शिशुपालपक्षीय राजे तावा-तावानें उठले व युद्धाच्या ललकाऱ्या देत शिशुपालासह राजसूयाच्या मंडपांतून बाहेर पडले. शिशुपालानें सेना सिद्ध केली. वीरांनीं आपल्या ललनांचे निरोप घेतले. रथचक्रें धडधडूं लागलीं. शंखनिनाद सुरू झाले. हत्ती, घोडे तयार झाले. कोणी प्रेमानें, कोणी वीरवचनांनीं, कोणी मंगल कामनांनीं वीरांना निरोप दिले. शिशुपालाच्या सैन्यांत उत्पात होऊं लागले. भावी अनर्थाचे ते दूतच होते. अपशकुन सांगत होते कीं, शिशुपालाचीं शंभरवर्षे भरलीं!

यानंतर शिशुपालानें एक दूत भगवान् श्रीकृष्णाकडे पाठविला. तो बोलण्यांत चतुर होता. वरून स्तुति व आंतून निंदा करण्यांत तो मोठा निपुण होता. तो कृष्णसभेंत येऊन म्हणाला, " महाराज, शिशुपालाच्या वाक्शल्यांनीं तुम्ही अशान्त झालेले दिसतां. तुम्हांस ( कायमचे ) शांत करण्यासाठीं शिशुपाल येऊं पाहात आहे. तुमची चांगलीच पूजा बांधण्याची आमच्या धन्याची इच्छा आहे. शिशुपालास तुम्हांस दृढालिंगन द्यावयाचें आहे. तुमच्या मागचें शिशुपालाचें भय कायमचेंच नाहींसें करण्याची त्याची इच्छा आहे. " अशा प्रकारें वक्रोक्तिपूर्ण द्व्यर्थी वाक्यांनीं त्यानें शिशुपालाची युद्धेच्छा व्यक्त केली.

यावर सात्यकी म्हणाला, " तुमचें बोलणें पिंगळ्याच्या शब्दाप्रमाणें वरून गोड पण आंतून अवलक्षणी आहे. श्रीकृष्णाची अग्रपूजा पांडवांनीं केली यांत तुमच्या तोंडावर खेंटरें मारल्याचें दुःख तुम्हांस कां व्हावें ? "

श्रीकृष्णांनीं स्वतः कांहींच उत्तर केलें नाहीं. कोल्हेकुईला सिंहांनीं काय उत्तर द्यावयाचें ? वाचीवीरांचे शब्द नगाऱ्याप्रमाणें पोकळ असतात हें त्यांना चांगलें माहीत होतें. नीचांना आपली दुष्ट उर्मी दाबून ठेवतां येत नाहीं हेंच खरें. सज्जन ते सज्जनच. भगवान कृष्ण शिशुपालाचे अपराध आठवूं लागले. पण त्यांना ते स्मरेचनात.

परउपकार स्मरण्याची ज्यांच्या मनाला नित्य संवय, त्यांना अपकाराची आठवण कशी व्हावी ? पण कोणीं एकानें उत्तर केलें कीं, " तुझा शिशुपाल युद्धासाठीं म्हण, शांतीसाठीं म्हण, यायचा तो एकदां येऊं देच. कोण कोणाची शांति करतो, हें युद्धभूमीच सांगेल ! आमच्याहि क्रोधाला मर्यादा आहे. "

यावर तो शिशुपालाचा खंवचट दूत म्हणाला, " कृष्णा, तूं शिशुपालाला शरण येणेंच श्रेयस्कर ! धर्मानें तुझी अग्रपूजा केली व शिशुपाळाची केली नाहीं, म्हणून त्याची किंमत थोडीच कमी व्हावयाची आहे ! हत्तीच्या गंडस्थळांतील मांस खाल्लें व मोती फेकून दिले तरी मोती ते मोतीच. तूं शिशुपालाला आज शरण आलास तर बालकृष्णाचें रक्षण करून " शिशुपाल " हें आपलें नांव तो अद्यापहि सार्थ करील. "

यावर कृष्णपक्षीयांनीं त्या दूतास सभास्थानांतून हुसकून दिलें व सर्व यदुसेना युद्धार्थ सज्ज झाली. शिशुपालाची सेनाहि युद्धार्थ बाहेर पडली. पायदळ पायदळाशीं, घोडेस्वार घोडेस्वारांशीं, हत्ती हत्तींशीं भिडले. वीरगर्जनांनीं आकाश दुमदुमून गेलें. तें युद्ध पाहाण्यास देवांनीं नभोमंडळांत गर्दी केली व धराशायी होणाऱ्या वीरांना उचलून नेण्यासाठीं स्वर्गांगना उतावीळ झाल्या. गजदलाचें

२०९६५
०२३

युद्ध तर फारच भयंकर झालें. ते पायांनीं, शुंडांनीं व दंतांनीं, असें विविध युद्ध करीत होते. जे वीर लढतां लढतां मरत ते सूर्यमंडलाचा भेद करून स्वर्गांत जाण्याच्या आंत त्यांच्या स्त्रिया सती जाऊन स्वर्गांत त्यांचे आधीं पोहोंचत.

परशुरामानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली, तेव्हां रक्ताचे पांचच डोह भरले. पण या युद्धांत रक्ताच्या नद्या वाहिल्या व त्यांतून हत्तीचे बुडलेले पाय वाहातांना कासवासारखे दिसूं लागले. कावळ्यांना व गिधाडांना फारच मोठी मेजवानी आज मिळाली.

नरकासुराचा पुत्र वेणुदारी बलरामावर धांवून गेला. सात्यकीनें शाल्वावर आक्रमण केलें. महाप्रतापी प्रद्युम्नानें बाणावर हल्ला चढविला. त्या दोघांचें भयंकर युद्ध पाहून देवतांच्या अंगावरहि कांटा उभा राहिला.

यावर मेघश्याम श्रीकृष्ण शिशुपालाशीं युद्ध करण्यास सज्ज झाले. त्यांनीं आपलें शार्ङ्गधनुष्य वर उचललें व बाणांचा वर्षाव शिशुपालावर सुरू झाला. शिशुपालाच्या सैनिकांना श्रीकृष्ण एकच पण भयानें द्विविध, त्रिविध, चतुर्विध दिसून ते पटापट पंचत्व पावत.

यानंतर शिशुपालानें मायायुद्ध सुरू केलें. प्रथम त्यानें

निद्रास्त्र फेंकलें, तेव्हां यदुसेना बाणावरच पडून झोंपूं लागली. फक्त या स्वापास्त्राचा श्रीकृष्णावर कांहींच परिणाम झाला नाहीं. स्वापास्त्रानें सर्व झोंपीं गेले असतां, एकटे कृष्ण जागृत होते. त्यांनीं आपल्या नेत्रांतील दिव्य तेजानें तें स्वापास्त्र शांत केलें. यावर शिशुपालानें यदुसेनेवर सर्पास्त्राचें अभिमंत्रण केलें. त्यावर कृष्णानें गरुडास्त्राचें नियोजन केलें, तेव्हां सर्व साप आपला काळ गरुड पाहून पाताळांत घुसले. यावर शिशुपालानें आग्नेयास्त्र फेंकलें, तेव्हां यदुसेनेबरोबर सर्व जग जळतें कीं काय असें थोडा वेळ भासलें. परंतु श्रीकृष्णांनीं आग्नेयास्त्रावर वारुणास्त्र टाकतांच सारें आकाश काळ्या मेघांनीं भरून आलें. विजा कडकडूं लागल्या व पर्जन्याच्या वर्षावानें सारा अग्नि एका क्षणांत शांत झाला.

यावर क्रुद्ध होऊन शिशुपाल श्रीकृष्णावर शिव्यांचा वर्षाव करूं लागला. त्याचे शंभर अपराध भरले. पापांचा घडा पुरा झाला. त्याचीं शंभर वर्षें भरलीं! तत्काल श्रीकृष्णांनीं आपलें अचूक सुदर्शन शिशुपालाच्या मस्तकावर फेंकलें. त्यानें शिशुपालाचें मस्तक धडापासून एका क्षणांत अलग केलें. इतक्यांत शिशुपालाच्या देहापासून एक ज्योति वर आली व ती पाहतां पाहतां श्रीकृष्णाच्या देहांत समाविष्ट झाली. हें पाहून सर्वांना फार विस्मय वाटला.

तेव्हां देव-दुंदुभी वाजूं लागल्या. स्वर्गांतून भगवान् श्रीकृष्णावर पुष्पवृष्टी झाली. ऋषिगण भगवंताचीं स्तुति-स्तोत्रें गाऊं लागले. पांडवांनीं प्रार्थना केल्या. भीष्मांनीं हर्षातिरेकानें सिंहनाद केला. पुढें राजसूयाची यथाविधि सांगता झाली. शत्रुसूदन कीं राजसूयहवन ही प्रथम पडलेली समस्या आपोआपच सुटली. दोन्ही कार्यें एके वेळीं एकाच ठिकाणीं पार पडलीं. हा सर्व त्या मंगलमय प्रभूचा महिमा पाहून सर्वांनीं त्या श्रीहरीला नमस्कार केला.

२०९६५
०२३
२५।७।२।४९

## पहिली अखंड भरारी (The Spirit of St. Louis)

अनु. : शं. ल. चिटणीस — चार्ल्स लिंडबर्ग

न्यूयॉर्क ते पॅरिस अखंड विमान-भरारीची ती रोमांचकारी सत्यकथा स्वत: वैमानिकच सांगत आहे. रु. १–८–०

## अणूची कथा (Report on the Atom)

अनु. : प्रा. एम. पी. जंगी — गॉर्डन इव्हॅन्स डीन

अणुयुगाच्या पहिल्या दहा वर्षांचा हा आढावा सामान्य माणसालाहि अणूचें यथार्थ-दर्शन घडवील. रु. १–८–०

## महान परिवर्तन (The Big Change)

अनु. : शं. ल. चिटणीस — फ्रेड्रीक ल्युइस ॲलन

अमेरिकेच्या जीवनांत केवढें हें विलक्षण स्थित्यंतर चालू शतकाच्या पूर्वार्धात घडून आलें आहे ! रु. १–८–०

## ॲब्राहम लिंकन (Abraham Lincoln)

अनु. : गोपाळराव कुलकर्णी — एमिल लुड्विग

मुक्त झालेल्या गुलामांच्या डोळ्यांत कृतज्ञतेचे अश्रु उभे राहिले. त्यासाठींच लिंकन जगला व हुतात्मा झाला. रु. १–८–०

## वादळ (Storm)

अनु. : प्रा. य. ग. नाईक — जॉर्ज स्टुअर्ट

ही आकर्षक हकीकत एका काल्पनिक वादळाची खरी पण कादंबरीइतकीच चटकदार ! रु. १–८–०

वोरा ॲन्ड कं., पब्लिशर्स, प्रायव्हेट लि., मुंबई २.

...५७६५

IRBK-0105765

IRBK-0105765